# मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तथा सक्षम प्राधिकारी यांचेसमोर

( क्र.०५/ व्हिओसी/सुनावणी/२०२६ /236)

महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ अन्वये अर्ज.

सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,घोलेरोड पुणे ... अर्जदार

विरुध्द

संचालक
महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज,टेंभूर्णी
ता. माढा जि. सोलापूर ... प्रतिवादी

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत अभ्यासक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ चे कलम ५ व "महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यासक्रम (तक्रारी, अपील व सुधारात्मक उपाययोजना) नियम, २०२४" निर्गमित केले आहेत.

## पूर्वपीठिका

महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज, टेंभूर्णी, ता. माढा, जि. सोलापूर या संस्थेत क्रॉप सायन्स हा द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम शासनाची मान्यता प्राप्त नसताना अनधिकृतपणे सुरू असल्याची तोंडी तक्रार परिसरातील काही संस्थांकडून जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर यांच्याकडे प्राप्त झाली. त्यानुसार जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर यांनी त्यांच्या स्तरावर समिती नियुक्त करून सदर संस्थेची तपासणी केली व त्याचा अहवाल सादर केला. त्या अनुषंगाने सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी दिनांक २३/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरण संचालनालयास सादर केले. उपलब्ध अभिलेखांवरून शासनाची मान्यता प्राप्त नसताना क्रॉप सायन्स या अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात आल्याने महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत अभ्यासक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले.

२. सदर प्रकरणी अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक १६/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली. दरम्यान, संचालनालयाच्या दिनांक २५/११/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये

स्थापन करण्यात आलेल्या सत्यशोधन समितीचा अहवाल सादर करण्याबाबत प्रादेशिक कार्यालय, पुणे यांना दिनांक २०/०२/२०२५ रोजी पत्राद्वारे कळविण्यात आले. त्यानंतर दिनांक २७/०६/२०२५ रोजी स्मरणपत्र क्र. १ निर्गमित करण्यात आले. यानंतर संचालनालयाच्या दिनांक ०७/०८/२०२५ रोजीच्या सुधारित कार्यालयीन आदेशान्वये गठित करण्यात आलेल्या सत्यशोधन समितीच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्यासाठी दिनांक १२/०९/२०२५ रोजी स्मरणपत्र क्र. २ निर्गमित करण्यात आले. त्यानुसार प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी दिनांक १९/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सत्यशोधन समितीचा अहवाल संचालनालयास सादर केला. सदर अहवालाच्या परीक्षणानंतर संस्थेकडून प्रत्येक शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेल्या शुल्काचा तपशील तसेच शिक्षकांच्या नियुक्त्यांबाबत पुराव्यासह माहिती सादर करण्याच्या सूचना तत्कालीन संचालक यांनी दिल्या. त्यानुसार संचालनालयाच्या दिनांक २९/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर यांना आवश्यक माहिती व पुरावे संकलित करून अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले. तसेच दिनांक ०५/०३/२०२६ रोजी स्मरणपत्र क्र. १ निर्गमित करण्यात आले. त्यानुसार जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर यांनी दिनांक १९/०५/२०२६ रोजीचा सविस्तर अहवाल संचालनालयास सादर केला.

## सुनावणी

३. सुनावणीस खालील अधिकारी: प्रतिनिधी उपस्थित होते/

- श्रीमती सोनम चौधरी, सहायक संचालक (तां.), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, मुंबई
- श्री. ए. एम.ढाणके,सहा.संचालक(व)( अतां),प्रादेशिक कार्यालय पुणे,
- श्री.एस.आर.भालचिम, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर
- श्री.ना.सु.भानवसे , संचालक, महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज,टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर

अर्जदार व प्रतिवादी यांनी दिनांक १६/०१/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान तोंडी युक्तिवाद सादर केला. त्यानुसार सदर प्रकरण आदेशासाठी राखून ठेवण्यात आले (Case Closed for Order).

अर्जदार सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांचा युक्तिवाद

४. अर्जदार जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर यांनी नमूद केले की -

महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज,टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर या संस्थेत अनधिकृतपणे क्रॉप सायन्स हा व्दिलक्षी अभ्यासक्रम सुरु असल्याची तोंडी तक्रार जवळपासच्या संस्थांनी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,सोलापूर या कार्यालयाकडे केल्यानंतर त्यांनी त्यांच्या स्तरावर समिती नेमून सदर संस्थेची तपासणी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने सदरच्या अभ्यासक्रमास शासनाची कायम स्वरूपी मान्यता नसतांना संस्थेने दिनांक २४/१२/२०२१ च्या इरादा पत्रानुसार अनधिकृतपणे सदरचा अभ्यासक्रम चालू केल्याचे निदर्शनास येत असून संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ४१ विदयार्थ्यांचे प्रवेश व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये २९ विदयार्थ्यांचे अनधिकृत प्रवेश केल्याचे निदर्शनास येत असल्याचे प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी त्यांच्या दि.२३/०९/२०२४ च्या पत्रान्वये संचालनालयास सादर केले आहे.

शैक्षणिक सत्र २०२१-२२ साठी इच्छुक संस्थांना +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विना अनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम मान्यतेसाठी संकेतस्थळावर अर्ज सादर करण्यासाठी दिनांक ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यांत आलेली होती. यास्तव संस्थेने ऑनलाईन

अर्जाबाबत सर्व कार्यवाही दिनांक ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि संस्थेने निरीक्षण शुल्क दिनांक ०६/०१/२०२२ रोजी अदा केलेले आहे. सबब, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील मान्यता देण्याची कार्यवाही संपुष्टात आल्याने संस्थेच्या अर्जाबाबत पुढील कार्यवाही संचालनालयास करणे शक्य नसल्याबाबत संचालनालयाचे पत्र क्र.०८/व्हिओसी/मान्यता/२०२२/४९५, दिनांक ०६ जूलै २०२२ रोजीच्या पत्रान्वये संस्थेस तशा स्पष्ट सूचना देण्यांत आलेल्या होत्या.

## प्रतिवादी यांचा युक्तिवाद

४. प्रतिवादी संस्थेच्या संचालक यांनी नमूद केले की -

संस्थेस दिनांक २४/१२/२०२१ रोजी इरादापत्र प्राप्त झाले असून निरीक्षण शुल्कही भरलेले आहे. तथापि, निरीक्षण शुल्क भरूनही संस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण झाले नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. भविष्यात संस्थेचे निरीक्षण होऊन मान्यता प्राप्त होईल, या अपेक्षेने संबंधित अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, या प्रकरणी संस्थेकडून चूक झाल्याचेही त्यांनी मान्य केले.

यावर सुनावणीदरम्यान निदर्शनास आणून देण्यात आले की, संस्थेस निर्गमित करण्यात आलेल्या इरादापत्रातील अट क्र. १० मध्ये स्पष्टपणे नमूद आहे की, सदर इरादापत्र हे अभ्यासक्रम चालविण्याची मान्यता नसून संस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण पूर्ण होऊन स्वतंत्र मान्यता आदेश निर्गमित झाल्यानंतरच अभ्यासक्रम सुरू करता येईल. तसेच, अंतिम मान्यता आदेश प्राप्त होण्यापूर्वी प्रस्तावित अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत अभ्यासक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ अन्वये संबंधित संस्थेविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल, असेही इरादापत्रात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

तसेच, ज्या संस्थांनी निरीक्षण शुल्क भरले होते; परंतु त्यांचे प्रत्यक्ष निरीक्षण होऊ शकले नव्हते, अशा संस्थांना निरीक्षण शुल्क परत करण्यासाठी आवश्यक बँक तपशील संचालनालयास सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. सुनावणीदरम्यान याबाबत विचारणा केली असता संस्थेच्या प्रतिनिधींनी त्याबाबत माहिती नसल्याचे सांगितले. तथापि, अभिलेखांवरून संबंधित संस्थेने निरीक्षण शुल्क परत मिळण्यासाठी आवश्यक बँक तपशील संचालनालयास सादर केलेला असून, संचालनालयाच्या दिनांक ०३/०२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये संस्थेस निरीक्षण शुल्क परत करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

## निष्कर्ष

वरील सर्व कागदपत्रे, सुनावणीदरम्यान सादर करण्यात आलेले युक्तिवाद, सत्यशोधन समितीचा अहवाल तसेच जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर यांनी सादर केलेल्या अहवालाचा विचार करता, संबंधित संस्थेस क्रॉप सायन्स या व्यवसाय अभ्यासक्रमास शासनाची अंतिम मान्यता प्राप्त नसतानाही शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ४१, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये २९ व शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ३० विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे सिद्ध होते. त्यामुळे संस्थेने महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत अभ्यासक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ मधील तरतुदींचे उल्लंघन केल्याचे उपलब्ध अभिलेखांवरून स्पष्टपणे सिद्ध होते.

# आदेश

१. महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज,टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर या संस्थेवर रुपये ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र) इतकी शास्ती करण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणातील संबंधित संस्थेतील अनधिकृतरीत्या प्रवेशित विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असल्याने, त्यांचे प्रवेश रद्द करणे आजमितीस शक्य नाही.

३. संस्था भविष्यात अभ्यासक्रमास मान्यता नसतांना अशा प्रकारचे कोणतेही अनधिकृत प्रवेश करणार नाही याबाबत संस्थेने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर यांना हमीपत्र सादर करावे.

४. महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत अभ्यासक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ व महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यासक्रम (तक्रारी, अपील व सुधारात्मक उपाययोजना) नियम, २०२४ नुसार अनधिकृत प्रवेशाबाबत ठोठावण्यात आलेला शास्तीचा भरणा खालील लेखाशिर्षामध्ये करुन भरणा केलेल्या चलनाची साक्षांकित प्रत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर यांचे मार्फत तात्काळ संचालनालयास सादर करावी.

विभाग- ०२०२ शिक्षण क्रिडा, कला व संस्कृती

प्रधान शिर्ष:-०१, सर्वसाधारण शिक्षण

उपप्रधान शिर्ष:- (०१) (०८) संकीर्ण

संगणक साकेंतांक: -०२०२ ००८२

५.या आदेशाच्या दिनांकापासून दोन आठवडयाच्या आत शास्तीचा भरणा करणे आवश्यक राहील.

६. प्रस्तुत निर्णयाची माहिती सर्व संबंधितांना कळविण्यात यावी.

या सुनावणी आदेशाबाबत संस्थेस अपील करावयाचे असल्यास अधिनियमातील कलम ७ अन्वये नियुक्त अपिलिय अधिकारी, सहसचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांचेकडे आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांत अपिल करता येईल.

स्थळ: - मुंबई
दिनांक: - 16/07/2026

(सतिश सूर्यवंशी)
संचालक

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा.सहसचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे
३. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय,सोलापूर यांना कळविण्यात येते कि, सदर संस्थेने उक्त शास्तीची रक्कम भरल्याशिवाय सदर संस्थेबाबत पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये. तसेच सदर शास्तीच्या रक्कमेच्या चलनाची प्रत संचालनालयास सादर करण्यांत यावी.
४. महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज,टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, सोलापूर यांचेमार्फत)
५. निवडनस्ती (का.क्र.०५)